बुद्ध सुत्त (स्तुती)

पहावे सदा शांत ते बुद्ध ध्यान
जगात घुमवू आणि शांती ज्ञान
करा चिंतनाला व्हा एकतान
जपा नाम तेथेच विसरून भान
पहा बोधिवृक्ष तळी बैसलेली
अहा रागलोभा जणू जिंकलेली
करुणामय मूर्ती तेथेच फिरली
तिच्या पायधुळीस लावू कपाळी
युद्धामुळे चालतात रक्तपात
होई तयाने मानवी अधः पात
निष्पाप रक्तात भिजलेले हात
ते पाहुनी गौतमा येई विट
बळी भिक्षुकांचे कुणी दिन होते
किंवा कोण चांडाळ विहिन होते
निराश्रित कुणी उदासीन होते
पशी दुःखितांसाठी कुणी न होते

यज्ञात जाती बळी मूक प्राणी
आली तयाने जगी धम्मग्लाणी
आक्रंदने येताच कानी
अशावेळी देतील ते बुद्धवानी
सांडुनिया थाट तो राजशाही
मिळवावया ज्ञान सिद्धार्थ जाई
का दुःख जगतात उमजेना काही

मोहात पडला क्षण एक नाही
अरे मानवांनो कशाला लढाई
रडतात विधवा इथे धाई धाई
नका विरतेची पुकारु बढाई
तरी भाऊ भावावर करत चढाई

जया पाहिजे रक्त तो देव कसला
भक्ती कसली आणि भाव कसला
हृदयी न उरला सत्यभाव कसला
तो देव कसला आणि धर्म कसला

हिंसा कुणाची करता कशाला
अरे एकमेकांस चिरता कशाला
मिथ्या मृग जळापाठी फिरता कशाला
हि कास नाशाची धरता कशाला

अहिंसा परमधर्म फिरवून ग्वाही
दया ब्रिद पिकवून ठाई ठाई
जना शांततेची देऊन ग्वाही
क्षमतेचा मुखी मंत्र करणेस ग्वाही

असा संघ निर्मि जेथे फक्त समता
असा धम्म शिकवी नसे तेथे अधमता
नसे वर्ण भेदाची तेथे विषमता
नसे वर्ण जेथे वसे फक्त ममता

एकत्र जेव्हा बहुसंख्य आले
समाजात जणू चैतन्य आले निराळे
जगाला जणू संजीवन ते मिळाले
अमंगल मनिभाव होत ते जळाले

किती स्तूप आणि किती ती विहारे
झडु लागली शांततेची नगारे
आणि तक्षशिला उघडुनी द्वारे
म्हणू लागले ज्ञान देते मी या रे

सहजीवनाची अमर पंचशिला
बंधुत्व सोपे शिकवू जगाला
एकेक भिख्खू जणू पाठशाला
पूर्वेस नवधम्म उदयास आला

शांतीचा घोष घुमतो जगात
न पडतील प्रेते पुन्हा संगरात
करी प्रेम देशावर अंतिम मात
प्रज्वलित झाली पुन्हा सत्यज्योत

करावी स्तुती बुद्ध देवा किती मी
देऊनी भक्ती कशी चक्रा गती मी
संसारी पडलो असा रे येथे मी
कसा येऊ तुझिया चरणा प्रती मी

कमलपुष्प हाती सदा हुंगणारी

मुखी प्रेम धम्मा जगा सांगणारी
तुझी मूर्ती हि चिंतनी गुंगणारी
दिन दु:खितांसाठी ती झुंजणारी

जडावा तुझ्या दर्शनाचाच छंद
सुटावेत हे मोहमायेचे बंध
सदा दरवळू दे तुझा किर्तीगंध
ठसव तुझी मूर्ती हृदयी अखंड

अजिंठाणी वेरूळ वदती कहाण्या
गुंफा आणि कैक कोरीव लेण्या
सौंदर्य लेऊन या शिल्पराण्या
उभ्या कैक वर्षे तुझे गीत गाण्या

इथे जागते शिल्प साकार होते
कलेच्याच द्वारे तुझे गीत गातो
कलावंत झाले चिरंजीव येथे
फुटे येथे वाचा मुक्या फत्तरातून

तुझ्यासाठी समदृष्टीचा लाभ व्हावा
मनी द्वेष क्रोधास थारा नसावा
तुझ्यासाठी हा देह माझा झिजावा
तुझे गुण गाता मला मृत्यू यावा

तुझ्यासाठी हा देह कृतार्थ व्हावा
तुझ्यापाशी मजला विसावा मिळावा

सुखाचा प्रभोतव निवारा मिळावा
अहंकार पाई तुझ्याही नसावा

ध्यानी तुझ्या नेत्र मिटतात माझे
मनोमंदिरात प्रतिमा विराजे
तुझे नाव साऱ्या त्रिखंडात गाजे
तुझ्या तत्वज्ञानास हे वैराग्य साजे

आम्ही दिन आलो तुझ्या आज द्वारी
शीलभंग होण्यास आम्हा शिसारी
तुझ्या तत्वज्ञानास जो अंगीकारी
नको त्यास कोणी लफंगा पुजारी

नमो बुद्ध देवा नमो शांती दूता
कुंठित झाली मती गुण गाता
सदोदित गाऊ तुझी प्रितगाथा
तू भाग्य आमचे नी मार्गदाता

नमो बुद्धाय!!!
जय भिम!!!